# आई

आई तू एक दैवी किमया
निरपेक्ष प्रेम अन निखळ माया
अस्तित्व माझे तुझ्याविना अपूर्णतेचे
प्रतिबिंबच मी तुझ्या संस्कारांचे
कितीही केला मी जरी वादविवाद
शेवट करीशी तू साधून सुसंवाद
झाली मला जाणीव जेव्हा मी झाले आई
मन होई विषण्ण पिल्लू घरट्यातून जाई
येता तुझी आठवण मन धावे माहेरा
डोळे मिटून घेते आठवत तुझा चेहरा
वाटे जावे धावत शिरावे तुझ्या कुशी
निघता परत म्हणशील थांबली असतीस तर जराशी
वाट पाहतो माझी बिलगण्या माझा बाळ
मन माझे आसुसले होत आली सांजवेळ
नाते आपुले गं हे एक नाळेचे
अतूट बंधन हेच एकमेव आयुष्याचे
राहो तुझी छत्रछाया अशीच आम्हावर
वंदन करीता तुला पावतो ईश्वर.

**पद्मजा लेले**